सार्वजनिक आरोग्य सेवा.
जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी,यांचे कार्यालय.
जिल्हा शासकिय रुग्णालय,रत्नागिरी, मेनरोड, रत्नागिरी - ४१५ ६१२.
☎- वैयक्तीक दुरध्वनी-०२३५२/ २२२१०६, कार्यालय दुरध्वनी. ०२३५२/२२२३६३,२२३२०६,२२२३६२
इमेल आयडी1. cs.ratnaggiri@gmail.com, 2. cs_ratnagiri@rediffmail.com


| | |
|---|---|
| **कार्यालयीन आदेश** | जा.क्र.जिशचिर/भांडार/ /२०२४.<br>जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी यांचे कार्यालय,<br>दिनांक - ३० / ०९ /२०२४ 12272 |

## जाहीर नोटीस

सुचित करणेत येते की,जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी कार्यालयामार्फत एक वर्ष कालावधी करीता व रुग्णांच्या नातेवाईक करीता भाडे तत्वावर उपहारगृह करीता खुली जागा देण्याचे निश्चित केले आहे.त्याकरीता सोबत जोडलेल्या यादीत यादी नुसार अटी व शर्थी खालील प्रमाणे आहेत.इच्छुकांनी सादर यादीचे अवलोकन करावे.

**दरपत्रके सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती -**

| | |
|---|---|
| ०१ | इच्छुकांनी वरील उपहार गृह करीता खुली जागा भाडयाने देण्याकरीता स्वतंत्रदरपत्रके सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावीत.प्रत्येक फर्मला फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी आहे. |
| ०२ | दरपत्रकांचे दर नमूद करताना अक्षरी व सांखिकी दोन्ही प्रकारे नमूद करणे आवश्यक आहे. |
| ०३ | दरपत्रकासोबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक, |
| ०४ | जी.एस.टी.नं.व प्रमाणपत्र व पॅन कार्ड |
| ०५ | संस्था/दुकान,उपकरणे उत्पादन/विक्री विषयक नोंदणी दाखला |
| ०६ | दरपत्रके पोहोच करणेचे ठिकाण:जिल्हा शल्य चिकित्सक,रत्नागिरी कार्यालयात कामकाजाच्या वेळेत (सुट्टीवगळता) दि.०१.१०.२०२४ ते दि.०७.१०.२०२४(५.०० वाजेपर्यंत) |
| ०७ | दर महिना १० तारखेच्या आत भाडे जिल्हा शल्य चिकित्सक,रत्नागिरी कार्यालयात कामकाजाच्या वेळेत जमा करणे व पावती घेणे बंधनकारक आहे. |
| ०८ | दरपत्रधारकाने ५००रु स्टॅम्प पेपर वर नमुना अ नोटरी करुन १० दिवसात सादर करणे बंधनकारक आहे. |
| ०९ | तसेच आयकर,जि.एस.टी.इ.तसेच नियमानुसार जे शासकीय कर लागू आहेत सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. |
| १० | सदर दरपत्रकाधारकाने राज्य शासन/केंद्र शासनाचे सर्व शासन निर्णय व परीपत्रके व नियम पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील |
| ११ | विज मिटर व पाणी मिटर स्वखर्चाने बसविणे व त्याचे देयक अदा दरपत्रकधारकाने करावे. |
| १२ | उपहार गृहातील सर्व अन्न पदार्थ व इतर वस्तू अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नियमानुसार योग्य दर्जाच्या असणे बंधनकारक आहे. |
| १३ | उपहारगृह सुरु ठेवणे अथवा बंद करणे या बाबतचे सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक ,रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| १४ | कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक,रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.दरपत्रकाचा कालावधी एक वर्षाचा असेल याबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास ते रत्नागिरी न्यायाधिकरण कक्षेत राहील. |
| १५ | सदर जागेचे क्षेत्रफळ ४६.४५ चौ.मी.राहील व त्यांचे प्रति महिना भाडे १८०० रुपये या प्रमाणे राहील |

जिल्हा शल्य चिकित्सक,रत्नागिरी

D: Leter Head